# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### पाचोरा (जि. जळगांव ) महावितरण विभागांतर्गत अभियंता व तांत्रिक कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(१) १३४३ (२२-१२-२०१४). श्री. किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा (जि. जळगांव) महावितरण विभागांतर्गत अभियंता व तांत्रिक कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०३-२०१५) :** (१) होय.

(२) अभियंता संवर्गातील पदे भरण्याकरीता जाहिरात क्र. ०४/२०१४ दि. १६.०७.२०१४ व जाहिरात क्र. ०६/२०१४ दि. १६.१२.२०१४ नुसार भरती प्रक्रिया सुरु आहे. तांत्रिक कर्मचा-यांपैकी वर्ग-४ ची प्रारंभिक पदे भरतीबाबत जाहिरात क्र. ०५/२०१४ दि. २९.०८.२०१४ नुसार भरती प्रक्रिया सुरु आहे. इतर वर्ग-३ व वर्ग-४ च्या तांत्रिक कर्मचा-यांची पदे पदोन्नतीद्वारे भरण्याबाबत अनुक्रमे जळगांव मंडळ कार्यालय व पाचोरा विभागीय कार्यालयास आदेशीत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**चंद्रपूर वीज केंद्रातील निर्माणाधीन संचाच्या पूर्णत्वाचा कालावधी लांबणीवर गेल्याबाबत-**

**(२) १४३७ (१५-०१-२०१५). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर वीज केंद्रातील निर्माणाधीन संचाच्या पूर्णत्वाचा कालावधी लांबणीवर गेल्याने महानिर्मितीचे आतापर्यंत रु.१.७५२ कोटींचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संचाचे काम पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०३-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदर संच विलंबाने कार्यान्वित होत असल्यामुळे प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जावरील व्याजाच्या रकमेत होणारी वाढ व भाव वाढ (Price Variation) यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होणार आहे. तथापि, होणा-या विलंबास जबाबदार संबंधीत कंत्राटदाराकडून विलंबा पोटी नियमानुसार आवश्यक रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात येणार आहे.

(२) प्रकल्पाच्या प्रगतीवर सूक्ष्म निरीक्षण ठेवण्यासाठी मे.स्टिग या सल्लागार कंपनीस नेमण्यात आले असून कंत्राटदारासोबत प्रकल्पाच्या कामांच्या प्रगतीबाबत उच्चपातळीवर नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच कोळशाच्या उपलब्धतेसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) मुख्य संयत्राचे कंत्राटदार मे. भेल यांच्याकडे कामांचे अधिक्य, उशिरा व क्रमवारीने न झालेला यंत्रसामुग्रीचा पुरवठा, त्यांच्या उप कंत्राटदाराद्वारे अपु-या मनुष्यबळाचा वापर व वारंवार काम बंद करणे तसेच उर्वरित संयंत्राचे कंत्राटदार मे. बी.जी.आर. ही कंपनी आर्थिक अडचणीतून जात असल्याने त्यांच्या पुरवठादार व उपकंत्राटदाराची देयके देण्यात विलंब झाल्यामुळे उपकंत्राटदाराची व पुरवठादार यांनी वारंवार काम बंद करणे यामुळे सदर संच उभारणीस विलंब झालेला आहे.

---

**औष्णिक विद्युत केंद्राकडे येणा-या कोळशातील विविध घटकांचे प्रमाण तात्काळ मोजणारी यंत्रणा कार्यान्वित करण्याचा प्रस्तावाबाबत**

**(३) २१२० (२२-१२-२०१४). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औष्णिक विद्युत केंद्राकडे येणा-या कोळश्यातील विविध घटकांचे प्रमाण तात्काळ मोजणारी यंत्रणा कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावित यंत्रणा ही अत्याधुनिक मानवी हस्तक्षेप नसणारी (Coal Anlizer) प्रस्तावित आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित केलेल्या यंत्रणेच्या कार्यान्वयनाचा निश्चित कालावधी किती व याकरीता निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, पर्यायी उपाययोजना काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०३-२०१५) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सध्या कोळशाच्या उष्मांक मोजण्याकरिता बॉम्ब कॅलरिमीटर हे यंत्र सर्व औष्णिक विद्युत केंद्रात कार्यान्वित असून कोळशाची आर्द्रता व राख मोजण्याकरिता टीजी ॲनेलयझर हे यंत्र काही औष्णिक विद्युत केंद्रात कार्यान्वित आहे.

---

**राज्यातील औरंगाबाद, मुंबईतील मदनपुरा, भायखळा या भागातील वस्त्यांत अंमली/मादक पदार्थ विक्रीवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत**

**(४) २२०७ (२२-१२-२०१४). श्री. इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), ॲड. वारीस पठाण (भायखळा), श्री. समीर कुणावार (हिंगणघाट), श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औरंगाबाद, मुंबईतील मदनपुरा, भायखळा या भागातील मुस्लीम व दलित वस्त्यांत चरस, गांजा, अफीम इत्यादी सारख्या अंमली/मादक पदार्थ्यांची रोजच दिवसाढवळ्या विक्रीद्वारे हजारो तरुणांना व्यसनाधीन बनवून लाखो संसार उद्धस्त करण्यात येत असतानाही पोलीस कारवाई होत नसल्याची असंख्य तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक धार्मिक संघटनांचे पदाधिकारी जागरुक नागरिक यांनी मा.मंत्री (गृह), मा.राज्यमंत्री (गृह), मा.पोलीस महासंचालक (महा.राज्य) मा.पोलीस आयुक्त (मुंबई/औरंगाबाद), यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१४ वा त्यासुमारास लेखी स्वरुपात दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजतागायत याबाबत कोणती ठोस कायदेशीर कारवाई करण्यात आली तसेच अंमली पदार्थ विक्री करणा-या किती समाजकंटकांना अटक करुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.

(२) पोलीस आयुक्त, औरंगाबाद कार्यक्षेत्रात दिवसाढवळ्या अंमली पदार्थांची विक्री होत नसून अंमली पदार्थ कायद्यान्वये गुन्हे दाखल करुन ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मुंबई पोलीस ठाणे तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांनी मुंबई परिसरात विशेष मोहिम आखून एकूण २५७ गुन्हे नोंद करुन ३३० आरोपींना अटक करुन कारवाई केली आहे. तसेच त्यांचे सेवन करणा-यांविरुध्द १३२९६ गुन्हे दाखल करुन १७२८७ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे. भायखळा पोलीस ठाणे हद्दीत सन २०१४ मध्ये ०२ कारवाई करण्यात आल्या आहे. तसेच तेथे एकूण २२९ अंमली पदार्थ सेवन करणा-या लोकांवर एकूण १३० गुन्हे दाखल केले आहेत.

तसेच नागपाडा पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ सेवनार्थीवर १९९ गुन्हे नोंद करण्यात आले असून त्यामध्ये ४३६ इसमांना अटक करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई गोवा महामार्गावरील पनवेल व वडखळ दरम्यानच्या रस्त्याच्या चौपदरीकरणबाबत**

**(५) २२११ (२३-१२-२०१४). श्री. अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोवा महामार्गावरील पनवेल व वडखळ दरम्यानच्या रस्त्याच्या चौपदरीकरण करण्याच्या पहिल्या टप्प्यातील काम निधी अभावी सुरु केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त कामासाठी निधी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,
(३) उक्त प्रकरणी निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१५)** :(१) सदर काम खाजगीकरणांतर्गत असल्याने निधी उपलब्धतेबाबतचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यामध्ये औद्योगिक वसाहती व एम.आय.डी.सी स्थापन करण्याबाबत**

**(६) २२१३ (२२-१२-२०१४). श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील तीन तालुक्यांना मुख्यालयात औद्योगिक वसाहती स्थापण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतरी अद्याप तेथे एकही उद्योग सुरु झाला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू एमआयडीसी स्थापनेबाबत निर्णय होऊनही एमआयडीसी सुरु न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, एमआयडीसी सुरू करुन तेथील बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०५-०३-२०१५) :**(१), (२) व (३) गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी, कुरखेडा, धानोरा येथे लघु औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आले असून, तेथे भूखंडांचे आरेखन करुन गरजू उद्योजकांना भूखंडांचे वाटप करण्यात आले असून त्यासंबंधीची प्रस्तावित गुंतवणूक व रोजगार निर्मिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | औ.क्षे. | आरेखित केलेले भूखंड | वाटप भूखंड | गुंतवणूक लाखात रु. | रोजगार निर्मिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | अहेरी | ०३ | ०२ | ४१४४.०० | ८० |
| २ | कुरखेडा | १३ | ०२ | २५७.०० | २२ |
| ३ | धानोरा | १४ | ०१ | ७६.०० | १५ |
| | एकूण | ३० | ०५ | ४४७७.०० | ११७ |

नक्षलग्रस्त भागात उद्योग सुरु करण्यासाठी उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून शासनाने सामुहिक प्रोत्साहन योजना, २०१३ सुरु केलेली आहे. सदर योजनेतंर्गत लहान, मध्यम, मोठे तसेच अति विशाल उद्योग नक्षलग्रस्त भागात स्थापन व्हावे यासाठी उद्योगांना अनुदान देण्यात येते. त्यामुळे उद्योग सुरु होवून रोजगार निर्मिती होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरमोरी तालुक्यातील (जि.गडचिरोली) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत**

**(७) २२१४ (२२-१२-२०१५). श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैरागड हे आरमोरी तालुक्यातील (जि.गडचिरोली) मध्यवर्ती ठिकाण असून येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन विकास अधिका-यांचे पद गेल्या वर्षभरापासून रिक्त असल्याचे ऑक्टोबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १५ गावांच्या पशुवैद्यकीय सेवेचा भार असलेल्या या दवाखान्यात पशुधन विकास अधिकारी नसल्याने या परिसरातील पशुपालकांना आजारी जनावरांवर औषधोपचार उपचार होत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तातडीने या ठिकाणी पशुधन विकास अधिका-यांची नेमणूक करण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(४) अद्याप याबाबत निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पशुसंवर्धन खात्यात रिक्त असलेली पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची एकूण ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आले असून त्यानुसार आयोगाद्वारे परिक्षा घेण्यात आली आहे. आयोगाडकडून शिफारस पात्र उमेदवांरांची यादी प्राप्त होताच गडचिरोली जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यामध्ये सिंचनाच्या सोयी सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(८) २२२० (२४-१२-२०१४). श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यामध्ये सिंचनाच्या कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध नसून अनेक वर्षापासून वनकायद्यामुळे प्रलंबित असलेल्या प्रकल्पापैकी तुलतुली हा एक प्रकल्प असून सदर प्रकल्प पुर्नजिवीत करुन तालुकयातील शेतक-यांना सिंचनाच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी शेतक-यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्यानुसार सदरील कार्यवाही केंव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

असा मागणी प्रस्ताव प्राप्त झाला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील उपलब्ध उर्जेचा वार पाहता पुढील काही वर्षात सध्या उपलब्ध असलेले स्तोत्र पुरेसे पडणार नसल्याबाबत

**(९) २२३१ (२५-०१-२०१५). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उपलब्ध उर्जेचा वार पाहता पुढील काही वर्षात सध्या उपलब्ध असलेले स्तोत्र पुरेसे पडणार नाहीत, आपल्याकडे थोरियमाचे साठे विपुल प्रमाणात आहेत तसेच सौर उर्जेचाही अभाव नाही, परंतु आपल्याकडील सौर उर्जेवरील संशोधन हे परदेशांच्या तुलनेत नाममात्र असून अधिक संशोधनाची गरज आहे असे माहे नोव्हेंबर, २०१४ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत शासन काय धोरण अवलंबणार आहे, त्यात तपशील काय,
(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यातील उद्योग उभारणीसाठी नवीन गतिमान व्यवस्था कार्यन्वित करण्याबाबत**

**(१०) २२३९ (२२-१२-२०१४). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील उद्योग उभारणीसाठी विविध प्रकारच्या ७६ मंजु-या घ्यावा लागत असल्याने या प्रक्रियेत खूप वेळ जातो, हे टाळण्यासाठी लागणा-या मंजु-यांची संख्या किमान करुन त्या आठवडयाभरात मिळतील, अशी गतिमान व्यवस्था तयार केली जाईल अशी घोषण मा.उद्योग मंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशी नवीन गतिमान व्यवस्था कार्यन्वित करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२२-०१-२०१५) :** (१) "मेक इन महाराष्ट्र" संदर्भात दिनांक १७/९/२०१४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये उद्योग / व्यवसायांना लागणाऱ्या विविध ६७ नाहरकती / मंजु-यांची प्रक्रिया सुलभ व जलद करण्यासाठी अशा प्रक्रिया कमीत कमी करुन तसेच त्यासाठी लागणारा सध्याचा कालावधी किमान करण्याबाबत प्रशासकीय विभागांना निर्देश देण्यात आले आहेत.
(२) "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रमांतर्गत राज्यातील उद्योगांना लागणारे विविध परवाने / संमती यांची संख्या व त्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उप समिती स्थापन करणेबाबत तसेच राज्यात गुंतवणूक करणा-या उद्योगांना लागणा-या विविध परवाने / संमती जलद गतीने (Fast Track Approvals) उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागांच्या सचिवांची शक्तीप्रदान समिती गठीत करण्यास शासन निर्णय क्रमांक /२०१४ - मेइम- ८ उद्योग/८८.क्र.प्र. दिनांक ८/१/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

तसेच प्रधान सचिव (उद्योग) सातत्याने विविध प्रशासकीय विभागांच्या वरिष्ठ अधिका-यांसमवेत बैठका घेवून सदर प्रकरणी शासनस्तरावरुन करावयाच्या कार्यवाहीबाबत ठोस निर्णय घेण्यासाठी सर्वंकष प्रस्ताव सादर करण्यासाठी पाठपूरावा करीत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूरातील सुपर स्पेशलिटी विभागाची इमारत उभी करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(११) २२४६ (२२-१२-२०१४). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूरातील सिव्हील हॉस्पीटलच्या जुन्या बी ब्लॉकच्या इमारतीच्या काही भाग पाडून त्याठिकाणी सुपर स्पेशलिटी विभागाची इमारत उभी करण्यासाठी रु.५६ कोटी ३१ लाख खर्चाचा प्रस्ताव शासनाकडे सन २०१३ मध्ये वा त्यासुमारास पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग व वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यामध्ये छाननी अनुषंगाने विचार विनिमय सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केकती (ता.जि.अहमदनगर) येथे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याने प्रस्तावावर निर्णयात्मक कार्यवाही केलेली नसल्याबाबत**

**(१२) २२५४ (२३-१२-२०१४). श्री. विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केकती (ता.जि.अहमदनगर) येथील ग्रामस्थांनी स्वस्त धान्य दुकानांची मागणी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदनगर तालुक्याच्या तहसिल कार्यालयानी दिनांक ७/७/२०१४ रोजी मागणीच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करून जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ४ महिन्यांचा कालावधी झाला तरी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याने प्रस्तावावर निर्णयात्मक कार्यवाही केलेली नाही याची कारणे काय वा किती कालावधीत केकती या गावासाठी स्वस्त धान्य दुकान कार्यरत करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०२-२०१५)** :(१) सौ.विजया विठ्ठल बडे, अध्यक्ष, हिरकणी महिला बचत गट, रा.सैनिक नगर (केकती) यांनी दिनांक २२ मे, २०१४ रोजी स्वस्त धान्य दुकान व रॉकेल दुकानाची मागणी केली होती.

(२) व (३) होय,

तहसिलदार, अहमदनगर यांनी पाठविलेल्या दि.७ जुलै, २०१४ च्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करुन घेऊन, जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांनी दि.२४ नोव्हेंबर, २०१४ रोजी जाहिरनामा प्रसिध्द केला.

या जाहिरनाम्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या एकूण ४ बचत गटांच्या प्रस्तावांची छाननी निवड समितीने केली असता, यश महिला बचत गट, केकती यांचा अर्ज पात्र ठरला. त्यावर पंचायत समिती अहमदनगर यांचेकडून मागविलेला ग्राम सभेचा ठराव प्रतिक्षेत असून, तो प्राप्त होताच दुकान मंजूरीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

---

## परभणी जिल्ह्यातील धानोरा काळे गावाजवळील गोदाव रील नदीवरील पुलाची उंची वाढविणेबाबत

**(१३) २२६१ (२२-१२-२०१४). श्री. मधुसूदन केंद्रे (गंगाखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील धानोरा काळे गावाजवळील गोदावरील नदीवर पूलाचे बांधकाम सन २००१ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सदरहू पूलाच्या अलिकडे दिग्रस् उच्च पातळी बंधारा पूर्ण झाला असून या जलाशयाची पातळी ३६६ मीटर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जलाशयातील पाणीसाठा पावसाळयात पूर्णपणे भरल्यानंतर गोदावरी नदीवरील पूल पूर्ण पाण्याखाली जात असून पूलाची उंची वाढविणे आवश्यक आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, पूलाची उंची वाढविल्यास दिग्रस उच्च पातळी बंधारा पूर्ण क्षमतेने भरुन याचा लाभ पालम तालुक्यासहीत परभणी जिल्ह्याला होईल हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, गोदावरी नदीवरील पूलाची उंची वाढविण्याचे काम त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(५) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०२-२०१५)** :(१) हे खरे आहे.

दिग्रस बंधा-याची पुर्ण संचय पातळी ही ३६६.०० मीटर एवढी आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) पूलाची उंची वाढविण्यासाठीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ठेव तत्वावर करण्याचे नियोजित आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही प्रगत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदया व भंदारा जिल्ह्यातील पंचायत समितीच्या जीर्ण इमारतीबाबत**

**(१४) २२६३ (२२-१२-२०१४). श्री. विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील पंचायत समितीची प्रशासकीय इमारत फार जीर्ण झाली आहे, नविन इमारतीचे निर्माण करणे आवश्यक आहे, याबाबत गोंदिया जि.प. कडून प्रस्ताव सादर झाला आहे काय,

(२) असल्यास वरील प्रस्तावीत इमारतीच्या कामास शासनाने मंजूरी दिली आहे काय

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०३-२०१५) :** (१) गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव /अर्जुनी, गोरेगाव व तिरोडा आणि भंडारा जिल्ह्यातील साकोली व लाखांदूर पं.स.च्या इमारती जीर्ण झालेल्या आहेत.

याबाबत गोंदिया जिल्हा परिषदेकडून शासनास प्रस्ताव सादर झालेला नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गोंदिया सिंचन विभागाअंतर्गत चोरखमारा, बोदलकसा, खरबंदा, रिसाठा तलावाचे नुतनीकरणाचे अपूर्ण कामाबाबत**

**(१५) २२६५ (२४-१२-२०१४). श्री. विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया सिंचन विभागाअंतर्गत चोरखमारा, बोदलकसा, खरबंदा, रिसाठा तलावाचे नुतनीकरणाचे काम अपूर्ण आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, नुतनीकरणाचे कामे पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) कामे पूर्ण होण्याकरिता व वितरण व्यवस्था सुव्यवस्थित करण्याकरिता संबंधित विभाग कोणती उपाययोजना करीत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. गिरीष महाजन (०३-०३-२०१५) :**(१) अशंतः खरे आहे.

गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया या विभागातंर्गत खेरबंदा व रिसाला या दोन प्रकल्पांच्या नुतनीकरणाची कामे पुर्ण झाली आहेत, चोरखमारा व बोदलकसा प्रकल्पांच्या नुतनीकरणाची कामे ८० टक्के पुर्ण झाली आहेत.

(२) व (३) चोरखमारा व बोदलकसा प्रकल्पाच्या उर्वरीत कामांबाबत नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत क्षेत्रिय अधिका-यांना निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील कारागृह हस्तांतरण करुन कारागृहातील पदांना मंजूरी मिळण्याबाबत**

**(१६) २२६८ (२२-१२-२०१४). डॉ. देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील कारागृहाचे काम मंजूर होऊन सन २०१२ पूर्वी काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारागृहाबाबत पदाची मंजूरी व प्रशासकीय मंजूरी व हस्तांतरणाच्या कार्यवाही बाबत पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कारागृहासाठी आतापर्यंत किती खर्च झाला,
(४) असल्यास, सदर कारागृह पदांची मंजूरी व हस्तांतरण केव्हा पर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०३-२०१५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.
(२) दिनांक १६/१२/२०१४ रोजी कारागृह विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गडचिरोली कारागृहाचा ताबा घेतला आहे. तसेच शासन निर्णय, गृह विभाग, क्र.जेएलई-१०११/१४२९/प्र.क्र.३२६/पु.बा.क्र.६०/तुरुंग-१ दिनांक १२/०९/२०१४ अन्वये वेगवेगळ्या संवर्गातील एकूण १२७ पदे गडचिरोली जिल्हा कारागृहाकरिता नव्याने निर्माण करण्यास मान्यता दिली आहे.
(३) आतापर्यंत एकुण रु. १४७५.७२ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.
(४) पदांची मंजूरी व कारागृह हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण झाली आहे.

---

**गडचिरोली जिल्हा निवड समिती निर्माण करण्याबाबत**

**(१७) २२६९ (१५-०१-२०१५). डॉ. देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हा निवड समिती निर्माण करण्यासाठी शासनस्तरावर समिती गठन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील स्थानिक लोकांना नोकरी संबंधात जास्त संधी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,गडचिरोली जिल्हयातील स्थानिक सुशिक्षित वर्गाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून स्थानिक आदिवासी व गैर आदिवासी लोकांनी या विषयी आंदोलन केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) त्यामुळे गडचिरोली जिल्हयात खास बाब म्हणून गडचिरोली जिल्हा निवड समिती स्थापन करण्याविषयी शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१५) :**(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत नसलेली गट-क व गट-ब (अराजपत्रित) ही जिल्हास्तरीय पदे नामनिर्देशनाने भरण्याकरिता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि. १९.१०.२००७ अन्वये जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समिती, गडचिरोली कार्यरत आहे.
(२) गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे भरतांना जिल्हा निवड समितीकडून जाहिरात प्रसिध्द करण्यात येते. विहित अर्हताप्राप्त अर्जदारांची लेखी परीक्षा घेण्यात येवून विहित पध्दतीने गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड करण्यात येते.
(३) असे आढळून येत नाही.
(४) वरील भाग १) विचारात घेता नव्याने गडचिरोली जिल्हा निवड समिती स्थापन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडचिरोली येथील प्रस्तावित वैद्यकिय महाविद्यालय मंजूरीबाबत

**(१८) २२७२ (२२-१२-२०१४). डॉ. देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयात शासकिय वैद्यकिय महाविद्यालय स्थापित करण्याबाबत राज्य शासनाने प्रस्ताव तयार करून मंजूरीकरिता ऑल इंडिया मेडिकल कमेटीकडे प्रस्तावित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरील प्रकल्पास अंदाजित किती खर्च अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडचिरोली जिल्हयातील चार्मोशी, आष्टी व धानोरा येथील बस स्थानक व डेपोंच्या मंजूरीबाबत

**(१९) २२७४ (१५-०१-२०१५). डॉ. देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील चार्मोशी, आष्टी व धानोरा येथील बस स्थानक व डेपो मंजूर झालेले आहेत, बस स्थानक व डेपोची जागा सुद्धा मंजूर झालेली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१२-०२-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे.
गडचिरोली जिल्ह्यातील मोजा चार्मोशी व आष्टी येथील जागा अनुक्रमे ३.३५ हे. आर. व २.६८ हे. आर. मंजूर आहे. तथापि, रा.प. महामंडळाने त्यांच्या आवश्यकतेनुसार चार्मोशी येथे २.३० हे.आर. व आष्टी येथे १.३० हे.आर. जागेची मागणी जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेकडे केलेली आहे.
(२) जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी दिनांक १२.०५.२००४ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव महसूल व वन विभाग यांच्याकडे मंजूरीकरीता सादर केलेला आहे. सदर जागा रा.प. महामंडळास प्राप्त करुन घेण्यासंदर्भात महसूल व वन विभागाकडून मंजूरी प्राप्त झालेली नसल्याने त्या विभागाची मंजूरी घेण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच धानोरा येथील बसस्थानकाकरिता ०.७२ हे.आर. जागेवर बसस्थानक बांधण्याकरिता प्रशासकीय मंजूरी प्राप्त होवून रु. ६० लाख इतका निधी प्राप्त झालेला आहे. त्याप्रमाणे धानोरा येथील बसस्थानक बांधकामाच्या निविदा काढण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील भांडूप येथील डोंगराळ विभागातील झोपडपट्टीकरिता नियोजनबध्द मास्टर प्लान तयार करुन चटई निर्देशांक (एफएसआय) वाढवून देण्याबाबत

**(२०) २२७९ (२३-१२-२०१४). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील भांडूप येथील डोंगराळ विभागातील झोपडपट्टीकरिता नियोजनबध्द मास्टर प्लान तयार करुन चटई निर्देशांक (एफएसआय) वाढवून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, समाजसेवक व रहिवाशी यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २००८ रोजी मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धारावी, मुंबई येथील झोपडपट्टी प्रमाणेचा भांडूप येथील डोंगराळ भागास कठीण क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, धारावी येथील झोपडपट्टीचे निकष भांडूप विभागासाठी लावून पुनर्विकासाची योजना जाहिर करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१५) :**(१) भांडूप, मुंबई येथील डोंगराळ भाग कठिण क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भात भाडेकरु कृती समिती यांचे दिनांक ९.२.२००८ व तत्कालीन लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ६.१२.२०११ तसेच सध्याच्या लोकप्रतिनिधींचे दिनांक ६.२.२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) व (३) भांडूप येथील डोंगराळ भाग हा सद्यःस्थितीत कठिण क्षेत्र म्हणून घोषित केलेला नाही. बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या तरतूदीनुसार त्यातील अटीची पूर्तता होत असल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कठिण क्षेत्र घोषित करण्याचा विचार करता येतो. मा. सदस्यांना अपेक्षित असलेल्या भांडूप येथील "कठिण क्षेत्र" असलेलया भागाचा विनिर्देश केल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल.

---

**मुंबईतील भांडूप (प) येथील आरक्षित असलेले भूखंड क्र. ३७३, ३७४ व ३३७ या भूखंडाचे आरक्षण बदलल्याबाबत**

**(२१) २२८१ (२३-१२-२०१४). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भांडूप (प) येथील आरक्षित असलेले भूखंड क्र.३७३, ३७४ व ३३७ या भूखंडाचे आरक्षण बदलल्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर आरक्षण रुग्णालयासाठी आरक्षित असून भांडूप विभागात अन्य ॲमिनीटी प्लॉटमध्ये महानगरपालिकेने सुपर स्पेशालिटी रुग्णालय प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विभागात खेळाच्या मैदानासाठी भूखंड नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयासाठी आरक्षित असलेला भूखंड खेळाच्या मैदानासाठी मिळावा अशी मागणी मा.लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, खेळाच्या मैदानासाठी भूखंड आरक्षित करण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०१५) :**(१) होय,

मुंबईतील भांडूप (प) येथील आरक्षित असलेले भूखंड न.भू.क्र. ३७३ व ३७४ मौजे कांजूर हे भूखंड विकास नियोजन आराखडयानुसार अनुक्रमे रुग्णालय व दूरध्वनी केंद्र तसेच खाजगी उदयान या सार्वजनिक उद्दिष्टासाठी आरक्षित आहेत. सदर आरक्षण बदलण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांची निवेदने बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त आहेत.

(२) होय,

न.भू.क्र. ३७३ मौजे कांजूर हा भूखंड रुग्णालय व दूरध्वनी केंद्र म्हणून आरक्षित आहे.

एस-विभागातील न.भू.क्र. ६८१/८/ब मौजे नाहूर धारण करणारा व १८००० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर मुंबई महानगरपालिकेचे सुपर स्पेशॅलिटी रुग्णालय प्रस्तावित आहे.

(३) न.भू.क्र. ३७३,३७४ व ३३७ मौजे कांजूर या परिसरात खेळाच्या मैदानासाठी सद्यस्थितीत भूखंड उपलब्ध नाही. तथापि, एस विभागाच्या सुधारित मंजूर विकास आराखडयानुसार भांडूप (प) विभागाच्या सुधारित मंजूर विकास आराखडयानुसार भांडूप (प) येथे साधारण २० भूखंड खेळाचे मैदानाकरिता आरक्षित आहेत.

(४) होय.

महानगरपालिकेने न. भू.क्र. ६८१ अे/बी मौजे नाहूर येथे सुविधा क्षेत्राच्या भूखंडामध्ये सुपर स्पेशालिटी रुग्णालय प्रस्तावित केलेले असल्यामुळे नगर भूमापन क्र. ३७३ मौजे कांजूर येथील रुग्णालयाचे आरक्षण बदलून त्याऐवजी सदर ठिकाणी खेळाचे मैदानासाठी आरक्षण करण्याबाबत विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी केलेली आहे.

(५) बृहन्मुंबई क्षेत्राचा मंजूर विकास आराखडा सुधारित करण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरु आहे. सबब बृहन्मुंबई महानगरपालिका प्रभागाच्या गरजा विचारात घेवून गुणवगुणानुसार खेळाचे मैदानासाठी भूखंड आरक्षित ठेवणेबाबत सुधारित विकास योजनेमध्ये त्याप्रमाणे प्रस्ताव नियोजित करु शकेल.

---

**राज्यातील मानसेवी वैद्यकिय प्राध्यापक व पूर्णवेळ प्राध्यापक यांच्यातील तफावती दूर करण्याबाबत**

**(२२) २२८५ (२२-१२-२०१४). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय दंत, आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयातील मानसेवी वैद्यकिय प्राध्यपकांना वयाच्या ७० वर्षापर्यंत नियमित करारावर नियुक्त केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्णवेळ प्राध्यापक आणि मानसेवी वैद्यकिय प्राध्यापक यांच्यामध्ये मोठा भेदभाव केला असल्याने ४०० मानसेवी प्राध्यापकांवर अन्याय झाल्याचे माहे एप्रिल, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मानसेवी वैद्यकिय प्राध्यापक व पूर्णवेळ प्राध्यापक यांच्यातील तफावतींचे स्वरुप काय आहे व त्या तफावती दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, व याबाबतची सद्यःस्थिती काय ?

**श्री. विनोद तावडे (१३-०२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. निर्णय क्र. सेवानि-४७११/प्र.क्र.३११/वैसेवा-२, दि.२५.०२.२०१४ व दि.८.०५.२०१४ अन्वये वय वर्ष ५८ वर्षनंतर नियुक्त करण्यात आलेल्या मानसेवी वैद्यकीय अध्यापकांवर शासकीय वैद्यकीय, दंत महाविद्यालय, दंत व आयुवैद महाविद्यालय व रुग्णालयातील कोणत्याही विभागाच्या विभाग प्रमुख वा पथक प्रमुख, कोणत्याही विभागाच्या विभागप्रमुख वा पथक प्रमुख, कोणतेही महत्त्वाचे प्रशासकीय कामकाज, संशोधन प्रकल्प इ.महत्त्वाचे कामकाज सोपविण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महिलांवरील अत्याचारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता**
**महिलांसाठी स्वतंत्र घर योजना लागू करण्याबाबत**

**(२३) २२८६ (२३-१२-२०१४). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिलांवरील अत्याचारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता पिडित महिलांसाठी आयपीएस, आयएएस पासून पत्रकारापर्यंत दिल्या जाणाऱ्या घरांप्रमाणेच स्वतंत्र योजना लागू करावी, अशी मागणी माहे मार्च, २०१४ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यासुमारास राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून म्हाडाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने त्यांची अंमलबजावणी केली आहे काय,

(३) या संदर्भात अद्यापही निर्णय घेतला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश मेहता (११-०३-२०१५) :** (१) राज्य महिला आयोगाकडून अशा प्रकारची मागणी म्हाडाच्या गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) परवडणाऱ्या घरांच्या वितरणाबाबत संबंधित विनियमांमध्ये सुधारणा सुचविण्यासाठी प्राधिकरण स्तरावर माजी सनदी अधिकारी श्री.सुरेशकुमार यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आले ल्या समितीच्या बैठकीत याविषयावर चर्चा करण्यात आली आहे. या समितीने केलेल्या शिफारशींवर प्राधिकरणाच्या बैठकीत चर्चा झाल्यावर प्राधिकरणाने पारीत केलेल्या ठरावानुसार शासनास प्राप्त होणा-या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**म्हाडाच्या योजनेतील घरांचा लाभ घेऊनही रक्कम अनेक लाभधारकांनी थकित ठेवल्याबाबत.**

**(२४) २२८९ (२३-१२-२०१४). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या योजनेतील घरांचा लाभ घेऊनही रक्कम अनेक लाभधारकांनी थकित ठेवल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील रक्कम वसूल करण्यासाठी शासनाने अभय योजना सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एवढे करुनही अनेक लाभधारकांनी रक्कम थकीत ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी कोणत्या कठोर उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. प्रकाश मेहता (११-०३-२०१५)** :(१) (२) व (३) म्हाडाच्या घरांच्या किंमतीच्या थकबाकी वसुलीचा नियमित आढावा घेतला जातो. त्यामुळे लाभधारकांनी रक्कम थकित ठेवल्याची बाब नोव्हेंबर २०१४ पूर्वीच उघडकीस आली आहे. अभय योजना घोषित करताना थकित रक्कम विचारात घेण्यात आलेली आहे.

म्हाडाच्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाच्या योजनेतील घरांचा लाभ घेऊनही मुद्दल व व्याजाची रक्कम थकित ठेवल्याने प्राधिकरणाने पारित केलेल्या ठराव क्र. ६६५३ दि.०८.०५.२०१४ अन्वये मुद्दल व थकित व्याज वसुल करण्यासाठी अभय योजना सुरु केली आहे.

गाळेधारकांकडून अभय योजनेअंतर्गत वसूलीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) अभय योजना खालील तीन टप्प्यात लागू करण्यात आली आहे.

पहिला टप्पा ०१.०९.२०१४ ते ३०.११.२०१४ पर्यंत,

दुसरा टप्पा ०१.१२.२०१४ ते २८.०२.२०१५

तिसरा टप्पा ०१.०३.२०१५ ते ३१.०५.२०१५

पहिल्या टप्प्यात मुद्दल व व्याज असे एकूण रक्कम रु. १२४.६५ लक्ष वसूल करण्यात आलेली आहे. तसेच दुस-या टप्प्यात वसुलीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. वरील तीन टप्प्यात अभय योजनेद्वारे थकित रक्कम व त्यावरील व्याज वसूल करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्यानंतरही थकित रक्कम न भरल्यास गाळेधारकांविरुध्द म्हाडा अधिनियम १९७६ चे कलम ६६ अन्वये कार्यवाही करण्याची तरतूद ठेवण्यात आली आहे.

---

**मुंबईतील आरे कॉलनी येथील सुमारे १८.५ एकर जागा ताब्यात घेण्याच्या मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाविरुध्द विकासकांनी तक्रार केल्याबाबत**

**(२५) २२९१ (२७-०१-२०१५). श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे कॉलनी येथील सुमारे १८.५ एकर जागा ताब्यात घेण्याच्या मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाविरुध्द विकासकांनी मा.महसूल मंत्री/मा.दुग्धविकास मंत्री यांचेकडे डिसेंबर, २०१३ मध्ये तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिह्याधिकाऱ्यांच्या आदेशाला उपरोक्त मंत्रीमहोदयांनी स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्याच, याची कारणे काय आहेत व स्थगिती आदेश केव्हा उठविण्यात येणार आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (१२-०२-२०१५)** :(१) आरे दुग्ध वासाहतीच्या सरहद्दीवर संरक्षण भिंत बांधण्याकरीता मे.रॉयल पाम लागून असलेल्या आरे दुग्धवसाहतीच्या ताब्यात नगर भूमापन क्र. १६२७, १६२७ब, व १६९३ या मिळकतीची मोजणी करण्यात येवून आरे व रॉयल पाम ची हद्द दर्शविण्यात आली. सदर मोजणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी रॉयल

पामकडून १८ एकर १५ १/२ गुंठे क्षेत्राचा ताबा आरे वसाहतीस देण्याबाबत दि. ०४/१२/२०१३ रोजी आदेश दिलेत. त्याबाबत मे रॉयल पाम यांनी दि. ०६/१२/२०१३ रोजी शासनाकडे फेरतपासणी अर्ज केला होता.

(२) होय, हे खरे आहे. मा.मंत्री (महसूल) यांनी मे.अमीर पार्क ॲण्ड अम्युझमेंट प्रा.लि. यांचे फेर तपासणी अर्जावर दि. १८ /१२/२०१३ च्या आदेशान्वये स्थगिती दिली होती.

(३) याबाबत मा.मंत्री (महसूल) यांचेकडे सुनावणी होवून दि. १८/०२/२०१४ च्या आदेशान्वये अर्जदारांच्या अर्ज फेटाळण्यात आला असून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे दि. ०४/१२/२०१३ या नोटिसीन्वये वाद क्षेत्राचा ताबा अर्जदार यांचेकडून काढून घेवून आरे दुग्धवसाहतीस देणेबाबतची कार्यवाही कायम केली आहे.

तद् नंतर मे. रॉयल पाम प्रा.लि. यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका ९५७/२०१४ दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

---

**जळगाव जिल्ह्यातील गिरणा पाटबंधारे विभागाने**
**पाण्याची तीन आवर्तने सोडण्याबाबत**

**(२६) २२९९ (२२-१२-२०१४). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील गिरणा पाटबंधारे विभागाने या भागात पाण्याची तीन आवर्तने सोडावीत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अभियंता, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव यांचेकडे निवेदनाद्वारे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या पंधरवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीवर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :**(१) होय.

(२) गिरणा धरणामध्ये दिनांक १५.१०.२०१४ रोजी २४५.५४ दलघमी (४६.५७ %) उपयुक्त पाणीसाठा आहे. त्यापैकी बिगर सिंचन आरक्षण व बाष्पीभवन वहन व्यय वजा जाता १०४.७४ दलघमी सिंचनासाठी शिल्लक होते. दिनांक ०३.११.२०१४ रोजीच्या कालवे सल्लागार समितीच्या बैठकीत पाणी साठ्यावर आधारित दोन आवर्तन देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव खुर्द येथील निर्मल स्वयंम सहायता बचत गटाने पोषण आहारातील**
**थकीत बिले काढण्यासाठी पर्यवेक्षीकेला लाच घेताना पकडल्याबाबत**

**(२७) २३०२ (२२-१२-२०१४). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव खुर्द येथील निर्मल स्वयंम सहायता बचत गटाने पोषण आहारातील थकीत बिले काढण्यासाठी पर्यवेक्षीका श्रीमती जागृती तायडे यांना ४ हजार रुपयांची लाच घेताना पकडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांविरुध् कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०२-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) ॲन्टी करप्शन ब्युरोच्या अहवालानुसार संबंधित पर्यवेक्षिकेला निलंबित करण्यात आले असून विभागीय चौकशी करण्यासाठी दोषारोपत्र ठेवण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**जळगाव जिल्हयातील गिरणा धरणाच्या पिंप्री शाखा अंतर्गत असलेल्या पाटचा-या व पाईपांची दुरुस्ती करण्याची मागणी**

**(२८) २३०५ (१५-१२-२०१४). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हयातील गिरणा धरणाच्या पिंप्री शाखा अंतर्गत असलेल्या पाटचा-या व पाईपांची त्वरीत दुरुस्ती करण्याची मागणी अंजनविहरे परिसरातील शेतक-यांनी संबंधित अधिका-यांकडे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१४ च्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०३-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.
अशी लेखी मागणी प्राप्त नाही. तथापि शेतचा-यावर विमोचक/शेत रस्त्यासाठी पाईप उपलब्ध करुन देण्याची तोंडी मागणी संबंधित लाभक्षेत्रातील शेतक-यांनी केली आहे.
(२) शेतक-या दुरुस्तीचे काम, पाईप टाकून पाणी नेणे इत्यादी कामे शेतक-यांनी स्वतः करावयाची आहेत. तथापि काही अपरिहार्य ठिकाणी विनावापर असलेले पाईप तात्पुरत्या स्वरुपात विमोचक, शेतरस्ता इत्यादीसाठी वारण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माटरगांव (जि.बुलढाणा) येथील जिल्हा परिषद शाळेत**
**शालेय पोषण आहारात अळया सापडल्याबाबत**

**(२९) २३१८ (२२-१२-२०१४). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटरगांव (जि.बुलढाणा) येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास खिचडी वाटप केल्यावर विशाल हिरडकर या विद्यार्थ्याला खिचडीमध्ये अळ्या दिसल्या ही बाब शिक्षक चोपडे यांना सांगितले असता त्या विद्यार्थ्यालाच मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, संबंधित शिक्षकांवर तसेच खिचडी तयार करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१५) :** (१), (२) व (३) कु.विशाल हिरळकार या विद्यार्थ्याने बाहेरून खिचडीत अळी आणून टाकल्याचे चौकशीत आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशांची पदे तातडीने भरण्याबाबत**

**(३०) २३२५ (१५-०१-२०१५). डॉ. संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रलंबित खटल्यांच्या तुलनेत २१२ अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशपदांची गरज असल्याचा अहवाल माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास उच्च न्यायालयाने विधी व न्याय विभागाला सादर केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानुसार या न्यायाधीशांची पदे तातडीने भरण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १९ /०४/२०१२ च्या न्याय निर्णयानुसार शासन निर्णय दि. ६/०१/२०१५ अन्वये राज्यातील कार्यरत १७८१ न्यायाधीशांच्या १० % म्हणजेच १७९ न्यायाधीशांची पदे निर्माण करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहर परिसरामध्ये मंगळसुत्र चोरी व घरफोडयाचे प्रकार घडत असल्याबाबत**

**(३१) २३५५ (२२-१२-२०१४). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहर परिसरामध्ये दररोज मंगळसुत्र चोरी व घरफोडया असे विविध प्रकार घडत असल्याची बाब निदर्शनास आली असून याबाबत स्थानिक शहर पोलीस प्रमुखाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे तसेच यामुळे चो-यांचे प्रमाण वाढत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१५) :**(१), (२) व (३)

सोलापूर शहर परिसरात माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये मंगळसुत्र चोरीचे ७ गुन्हे व घरफोडीचे १८ गुन्हे दाखल आहेत. अशा प्रकारच्या घटना दररोज घडलेल्या नाहीत.

सोलापूर शहर परिसरात जानेवारी ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत दाखल झालेल्या ४९ गुन्ह्यापैकी २५ गुन्ह्यात आरोपीना अटक करुन ७,६५,०००/- रुपयाचा माल हस्तगत केला आहे. तसेच घरफोडीच्या २१३ गुन्ह्यापैकी ३० गुन्ह्यात आरोपी अटक करुन त्यांचेकडून रु.१६.६३ लक्ष किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. उर्वरित गुन्हे उघडकीस आणण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. गुन्ह्यांना प्रतिबंध कारण्यासाठी सन २०१४ मध्ये १२६ वेळा नाकाबंदी करुन व्यक्ती व वाहनांची तपासणी केली रात्रगस्तीचे प्रमाणात वाढ करण्यात आली. परिसरात दरोडा प्रतिबंधक पेट्रोलिंग मोबाईल व प्रत्येक पोलीस ठाण्याचे मोबाईल व बीट मार्शल मार्फत पेट्रोलिंग केली जात आहे.

---

**राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकेतील शाळांना**
**वेतन व पेन्शनकरिता १०० टक्के अनुदान देण्याबाबत**

**(३२) २३६२ (२२-१२-२०१४). श्री. संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानित शाळांना वेतन व पेन्शनसाठी शासनामार्फत १०० टक्के अनुदान देण्यात येते मात्र नगरपालिका आणि महानगरपालिकेतील शाळांना केवळ ५० ते ८० टक्के अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तफावत दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१५) :** (१) होय,

(२) व (३) महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषदा यांच्या प्राथमिक शिक्षणावरील मान्य बाबींवर होणा-या खर्चामधील शासनाच्या हिश्याचे प्रमाण शासन निर्णय दि.१६/१२/८७ अन्वये निश्चित करण्यात आलेले आहे.

---

**राज्यात यशवंत ग्रामसमृध्दी योजना लोकवर्गणीच्या वाढीबाबत**

**(३३) २३६९ (२२-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यशवंत ग्रामसमृध्दी योजना लोकवर्गणीच्या वाढीसह पुन्हा नव्याने राबविण्याबाबतचा प्रस्ताव गेल्या एक वर्षापासून शासनाच्या विचाराधीन असून अद्याप निर्णय घेतलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदरच्या योजनेचे स्वरुप काय आहे?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) यशवंत ग्रामसमृध्दी योजना सुधारीत स्वरुपात राबविण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याच्या अनुषंगाने वित्त विभागाकडे अभिप्रायार्थ पाठविण्यात आला असता वित्त विभागाने यशवंत ग्राम समृध्दी योजनेप्रमाणेच पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना व मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधांच्या कामासाठी विशेष अनुदान (लेखाशीर्ष -२५१५-१२३८) या अन्य योजनांमधून घ्यावयाची कामेही जवळपास सारखीच असल्याने यशवंत ग्राम समृध्दी योजना पुन्हा सुधारित स्वरुपात राबविण्यासंदर्भात विभागाने पुनर्विचार करावा, असे अभिप्राय दिलेले आहेत. त्यामुळे सदर योजना सुधारीत स्वरुपात राबविण्याबाबत अद्याप शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) सुधारीत योजना राबविताना एकूण निधीत व लोकवर्गणीत वाढ करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**राज्यातील तृत्तीयपंथीय घटकांच्या विकासासाठी कल्याणकारी मंडळाबरोबरच त्यांच्यातील कला गुणांना वाव देण्यासाठी कला अकादमीची स्थापना करण्याचा प्रस्ताव**

**(३४) २३७९ (२२-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तृत्तीयपंथीय घटकांच्या विकासासाठी कल्याणकारी मंडळाबरोबरच त्यांच्यातील कला गुणांना वाव देण्यासाठी कला अकादमीची स्थापना करण्याचा प्रस्ताव गत एक वर्षापासून शासनाच्या विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कला अकादमी स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०२-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) शासन निर्णय क्र.तृतीयं-२०१४/प्र.क्र.४९/का-९, दि.६.०९.२०१४ नुसार राज्यातील तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करणेबाबत निर्णय झालेला आहे. सदर शासन निर्णयानुसार सदर मंडळाच्या कार्यामध्ये तृतीयपंथीयांच्या कला, सांस्कृतिक व क्रिडा गुणांना प्रोत्साहन देणे. तसेच त्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी कला अकादमी स्थापन करणे हे कार्य अंतर्भूत आहे.

मंडळाची संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्याची प्रक्रिया शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी येथील म्हाडाच्या कोकण मंडळाच्या कोकण नगर येथील कार्यालयातील सहाय्यकाला लाच घेताना पकडल्याची घटना

**(३५) २४१५ (२३-१२-२०१४). श्री. संजय कदम (दापोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी येथील म्हाडाच्या कोकण मंडळाच्या कोकण नगर येथील कार्यालयातील सहाय्यकाला लाच घेताना पकडल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात घटना घडल्यानंतर सदर कार्यालय बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०१५) :**(१), (२), (३) व (४) रत्नागिरी येथील कोकण नगर येथील कार्यालय वसाहतीमधील सदनिकांधारकांकडून सेवाशुल्क, भाडे, भुईभाडे, बिनशेतसारा इत्यादी वसूलीचा कालावधी पुरते खुले असते. प्रत्येक महिन्यात शेवटच्या आठवड्यातील २ ते ३ दिवस भाडेवसूलीकारांचे मार्फत तेथे उपस्थित राहून मंडळाची वसूली केली जाते.

लाचलुचपत विभागाच्या कार्यवाहीत दिनांक ०५.११.२०१४ रोजी अटक करण्यात आलेल्या श्री.विजय देसाई, सहायक यांना कोंकण मंडळातून दिनांक १५.११.२०१४ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या कलम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्याचे दिनांक ०२.०१.२०१५ रोजी ज्ञापन देण्यात आले आहेत.

---

**मौजे मंडणगड (ता.खेड, जि.रत्नागिरी) या ग्रामपंचायतीमधील अनधिकृत बांधकामाबाबत**

**(३६) २४१६ (२२-१२-२०१४). श्री. संजय कदम (दापोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मंडणगड (ता.खेड, जि.रत्नागिरी) या ग्रामपंचायतीत अनधिकृत बांधकामाबाबत अनेकदा जिल्हा परिषदेकडे तक्रारी करुन अनधिकृत बांधकामे निष्काषित करण्यात आली नाहीत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नंतर सदर बांधकामे निष्काषित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) होय.
(३) मंडणगड ग्रामपंचायतीच्या अनधिकृत अशा एकूण ५ बांधकामामध्ये ग्रामपंचायतीनी कोणतीच ठोस कारवाई केलेली नसल्याचे गट विकास अधिकारी, पंचायत समिती मंडणगड यांचे अहवालान्वये निदर्शनास आले. त्यामुळे ग्रामपंचायतीला सदर प्रकरणी ठोस कारवाई करण्याच्या सूचना जिल्हा परिषद स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी येथील एमआयडीसीतील वेरॉन कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या कामगारांनी कंपनीत युनियन स्थापन केल्याने ५६ कामगारांना कामावरुन काढण्यात आल्याबाबत**

**(३७) २४१७ (२३-१२-२०१४). श्री. संजय कदम (दापोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील एमआयडीसीतील वेरॉन कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या कामगारांनी कंपनीत युनियन स्थापन केल्याने ५६ कामगारांना कामावरुन काढण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१३ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कंपनीतील कामगारांना पुन्हा घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१२-०२-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.

व्यवस्थापनाने माहे नोव्हेंबर, २०१४ पासून ५२ कामगारांना कमी केले आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी चौकशी केली असता व्यवस्थापनाने आस्थापनेतील मशील फ्लोअर बंद केल्यामुळे या ५२ कामगारांना कमी केल्याचे सांगितले. सदर ५२ कामगारांमध्ये १३ कायम कामगार व ३९ कंत्राटी कामगार आहेत. कंत्राटदाराची अनुज्ञप्ती पाहता व व्यवस्थापनाने ३९ कंत्राटी कामगारांना शॉप फ्लोअर वर कायम स्वरुपी कामासाठी लावल्याचे निदर्शनास आल्यामुळे कंत्राटी कामगार अधिनियम, १९७० चे कलम १० (१) नुसार कार्यवाही करण्यात येत आहे तसेच व्यवस्थापनाने कामगारांना कमी करण्यापूर्वी कामगारासोबत कोणतीही बैठक अथवा नोटिस दिली नसल्याचे सांगितले व व्यवस्थापनाने लास्ट कम फर्स्ट आऊट या पध्दतीचा अवलंब केला नसल्याचे दिसून आले.

सदर ५२ कामगारांना कमी केल्याने कामगार संघटना प्रतिनिधी व व्यवस्थापन प्रतिनिधी यांची दिनांक १३.११.२०१४ रोजी क्षेत्रिय कामगार कार्यालयात बैठक आयोजित केली होती व सदर ५२ कामगारांना पुनश्च कामावर घ्यावे असे व्यवस्थापनास सुचविले परंतु व्यवस्थापन प्रतिनिधींनी पुन्हा कामगार हजर करुन घेण्यास नकार दिला. सदर आस्थपने विरोधात कंत्राटी कामगार अधिनियम १९७० अंतर्गत खटला मा.न्यायालय रत्नागिरी येथे दाखल करण्यात आला आहे तसेच क्षेत्रिय कामगार न्यायालयाकडून सदर विवादात व्यवस्थापकीय सल्लागार सेवा योजना प्रकरणी समझोता घडवून आणण्याच्या दृष्टिने कसोशीने प्रयत्न सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मस्जिद व मदरश्यांची दुरुस्ती व नुतनीकरणासाठी वाढीव एफएसआय देण्याबाबत**

**(३८) २४३२ (२३-१२-२०१४). श्री. प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मस्जिद व मदरश्यांची दुरुस्ती व नुतनीकरणासाठी १+१ अथवा वाढीव एफएसआय देण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) तसेच मदरश्यांमध्ये आधुनिक व कल्पक शैक्षणिक साहित्य व "ई" क्लास रुम उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०३-२०१५) :** (१) शासनाने बृहन्मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीत दिनांक २.३.२००९ च्या अधिसूचनेन्वये फेरबदल मंजूर करुन नवीन विनियम ३३(२५) अंतर्भूत केलेला आहे. सदर विनियमानुसार नोंदणीकृत धर्मादाय संस्थेच्या धार्मिक उद्देशाच्या इमारतीसाठी अधिमूल्याचा भरणा करुन ०.५० इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे. यापेक्षा अधिक अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्यासंदर्भात प्रस्ताव सध्या शासनाने विचाराधीन नाही.
(२) "मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण" च्या अनुषंगाने शासनाने राज्यातील नोंदणीकृत मदरशांना पायाभूत सोयी-सुविधा, मदरशांमध्ये आधुनिक विषय (विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी व इंग्रजी) शिकविणा-या शिक्षकांचे मानधन, ग्रंथालय व मदरशांमधील शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या बाबीसाठी अनुदान देण्याचा निर्णय दिनांक ११ आक्टोंबर, २०१३ रोजी घेण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जिल्हा जळगाव) येथील मायक्रो फायनान्स ह्या कंपनीने ठेवीदारांच्या कोट्यवधी रुपयाचा केलेला अपहार**

**(३९) २४४२ (२२-१२-२०१४). श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जिल्हा जळगाव) येथील मायक्रो फायनान्स ह्या कंपनीने ठेवीदारांचे कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्या संबंधीची तक्रार चाळीसगांव पोलीस स्टेशन मध्ये तक दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारी वरुन संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०१५) :** (१) होय, प्रश्नात नमूद कंपनीविरुध्द दि. १६/१२/२०१४ रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(२) व (३) प्राप्त तक्रारीवरुन मायक्रो फायनान्स कंपनीविरुध्द चाळीसगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४००/१४ भा.दं.वि. कलम ४२०,४०६,४०९,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपी फरार असून त्यांना अद्याप अटक झालेली नाही. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

---

**कोळखी ता.फलटण जि.सातारा येथील ग्रामपंचायत हद्दीतील मोकळ्या जागी अन्य इमारतीचे सांडपानी सोडलयाने तेथील लोकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(४०) २४५७ (२२-१२-२०१४). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळखी ता.फलटण, जि.सातारा येथील ग्रामपंचायती हद्दीतील सावतामाळी नगर, भुजबळ मळा, चितामणी पार्क या इमारतीच्या बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत आजूबाजूच्या जागेतील अन्य इमारतींचे सांडपांणी सोडल्याने तेथील अन्य लोकांचे आयुष्य त्यामुळे धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथे डेग्यु सदृष्य साथ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन या गंभीर प्रकरणी कोणती उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०३-२०१५) :** (१) होय.

हे अंशतः खरे आहे. चितामणी पार्क इमारत पुर्ण झाल्यानंतर इमारत बांधकामाचे बिल्डर यांनी पाईपलाईन करुन सदर इमारतीचे सांडपाणी ग्रामपंचायतीच्या गटारापर्यंत सोडले होते. चितामणी पार्क या इमारतीचे बांधकाम ज्या जागेमध्ये आहे, ती जमीन काळ्या मातीचीव क्षारपड आहे. सदर गटाराच्या पाईपलाईनवरुन जड वाहने गेल्यामुळे चितामणी पार्क इमारतीची सांडपाण्याची पाईपलाईन नादुरुस्त झाली आहे. ती पाईपलाईन दुरुस्त करण्याबाबत संबंधित इमारतीमधील फलॅटधारक व बिल्डर यांना कळविण्यात आले आहे. तसेच दुस-या एका इमारतीचे सांडपाणी सदरच्या मोकळ्या जागेत सोडण्यात आले होते ते बंद करुन ग्रामपंचायतीच्या गटारात सोडण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रामपंचायत कोळखीमार्फत वेळोवेळी फॉगींग मशीनने औषध फवारणी केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वरोरा, भद्रावती (जि.चंदपूर) येथील धरणांतून व लाल पोथरा धरणातून बांधण्यात आलेल्या कालव्यांची गत ५ वर्षापासून दुरुस्ती न करण्यात आल्याबाबत**

**(४१) २४५९ (२३-१२-२०१४). श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील वरोरा व भद्रावती तालुक्यात किती धरणे बांधण्यात आली व धरणापासून मुख्य कालवा व उपकालवे किती वर्षापासून बांधण्यात आले, त्या कालव्यापासून शेतकऱ्यांचे जमिनीला पिकांकरिता पाणी सोडण्यात येत आहे काय व ते केव्हापासून सोडण्यात येत आहे,

(२) वरोरा तालुक्यातील लाल पोथरा धरणापासून मागील २० वर्षापासून कॅनल बांधण्यात आले परंतू आजतागायत त्या कालव्यामधून पाणी सोडण्यात आलेले नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी का सोडण्यात आलेले नाही यांची कारणे काय आहेत तसेच लभानसराड/लाल/पोथरा नाला धरणाचे पाणी कालव्याचे शेवटचे टोकापर्यंत पुरविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील २० वर्षापासून पाणी का पुरविण्यात आले नाही याची कारणे काय आहेत,
(५) वरोरा/भद्रावती तालुक्यातील मागील ५ वर्षात कालवा दुरुस्तीचे कामाबाबत किती खर्च करण्यात आलेला आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०१-२०१५) :** (१) वरोरा व भद्रावती तालुक्यात ३ मध्यम प्रकल्प (चारगांव, चंदई व लभानसराडा), ३ लघु प्रकल्प व १ मा. मा. तलाव पूर्ण झालेले आहेत. या प्रकल्पावर बांधकाम पूर्ण झाल्यापासून सिंचन करण्यात येत आहे. लाल व पोथरा प्रकल्पाच्या वितरण प्रणालीची कामे प्रगतीपथावर आहे.
(२) नाही.

लाल - पोथरा धरणातून वरोरा तालुक्यात सन २०११-१२ पासून सिंचनाकरिता पाणी देण्यात येत आहे.
(३) लभानसराड धरणाचे पाणी सन २०१३-१४ मध्ये तसेच सन २०१४-१५ मध्ये कालव्याचे पुच्छ भागापर्यत पुरविण्यात आलेले आहे.

लालनाला व पोथरानाला प्रकल्पाच्या कालव्यामधून कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत कालव्याची कामे शिल्लक असल्याने पाणी पुरविण्यात आले नाही हे खरे आहे.
(४) लाल - पोथरा - लभानसराड संयुक्त कालव्याची अंशतः कामे भुसंपादनाच्या अडचणी व सुप्रमा मंजुरी अभावी अपुर्ण आहेत. त्यामुळे संपुर्ण क्षेत्राला पाणी पुरवण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.
(५) मागील पाच वर्षात रु. ३५४.५१ लक्ष खर्च करण्यात आलेला आहे.

---

**चंद्रपूर जिल्हयातील उद्योगामुळे होत असलेले प्रदुषण**

**(४२) २४६१ (१५-०१-२०१५). श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयामध्ये एकूण ७६ मोठे व मध्यम स्वरुपाचे उद्योग सुरु असून या उद्योगांमुळे जिहयातील रहिवाशांच्या आरोग्यावर प्रदुषणाचा फार मोठया प्रमाणात त्रास होत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर उद्योगांमध्ये प्रदूषण निर्माण होत आहे त्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१०-०३-२०१५) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार वाहनांची संख्या वाढल्याने व वायू प्रदूषण वाढले असून यापासून श्वसनाचे विकास दमा, खोकला, निमोनिया व ॲलर्जी या सारखे आजार होतात.

(२) चंद्रपूर जिल्ह्यातील गंभीर प्रदूषित क्षेत्र जसे बल्लारपूर, घुग्घुस, तडाली व एमआयडीसी चंद्रपूर या क्षेत्रातील प्रदूषणाची तीव्रता कमी करण्याकरिता कृति आराखडा राबविण्यात येत असून मप्रनिमंडळाच्या कार्यक्षेत असलेल्या कृति आराखड्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल तालुक्यंतील वन जमिनीवर आदिवासी बांधवांनी बांधलेली घरे नियमित करणेबाबत

**(४३) २४९२ (२२-१२-२०१४). श्री. संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यातील गावातील गावठाणाजवळ तसेच गावाच बाहेर आदिवासी वाड्या-पाडयाजवळ असलेल्या वन जमिनींवर आदिवासी बांधवांनी सुमारे ३० ते ४० वर्षापूर्वी गरजेपोटी घरे बांधली असून आदिवासी कुटूंबे तिथे वास्तव करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी बांधक घरपट्टी भरत असून त्याठिकाणी पक्के रस्तेही करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घरे नियमित करण्याबाबत वन हक्क समितीकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्यापी कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०२-२०१५) :**(१) हे अंशतः खरे आहे, पनवेल तालुक्यातील गावातील गावठाणाजवळ तसेच गावाचे बाहेर आदिवासी वाड्या पाड्याजवळ असलेल्या वन जमिनीवर आदिवासी बांधवांनी वास्तव्यासाठी अतिक्रमणे केली आहेत. सदर अतिक्रमण ३० ते ४० वर्षापासून नसून सर्वात जूने २३ वर्षापूर्वीचे आहे.

(२) हे खरे आहे, आदिवासी बांधव घरपट्टी भरत असून त्यांच्या वाड्यांवर जाणे येणेसाठी वहिवाटीने रस्ते अस्तित्वात आहेत. अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ चे कलम ३(२) प्रमाणे सामुहिक सुविधांतर्गत एका रस्त्याकरिता परवानगी दिली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६, नियम २००८, सुधारित नियम २०१२ नुसार ७८३ प्राप्त वैयक्तिक घरांचे दावे मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच वनहक्क कलम ३(२) अंतर्गत एका वाडीला रस्त्याकरीता परवानगी दिली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर पर्यटन क्षेत्राच्या विकासाबाबत**

**(४४) २४९५ (२२-१२-२०१४). श्री. मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर पर्यटन क्षेत्राच्या विकासाबाबतची माहिती जिल्हाधिकारी, रायगड यांनी ग्रामपंचायतीकडून मागितली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पर्यटन क्षेत्र विकासाबाबत माहिती ग्रामपंचायतीने जिल्हाधिका-यांना सादर केली आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त विकासाबाबत केव्हा पर्यंत कार्यवाही होण्याचे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यात सन २००३ साली महानगरपालिकेची निर्मिती होऊनही सदर महानगरपालिकेचया कारभार नगरपरिषदेच्या आकृतिबंधानुसार सुरु असल्याबाबत**

**(४५) २४९८ (२३-१२-२०१४). श्री. संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात सन २००३ साली महानगरपालिकेची निर्मिती होऊनही सदर महानगरपालिकेचा कारभार नगरपरिषदेच्या आकृतिबंधानुसार सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी पुरेशा कर्मचा-यांअभावी महानगरपालिकेचा कारभार मंदगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच अधिकारी/कर्मचारी भरतीचा आकृतीबंध मा.मुख्यमंत्री, सचिव, नगरविकास यांनी दिनांक १८ एप्रिल, २०११ रोजी पाठवूनही सदर प्रस्ताव अद्याप मंजूरी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावास तातडीने मान्यता देणेबाबत तसेच कर्मचा-यांची पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०१५) :**(१) व (२) तत्कालिन अहमदनगर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर महानगरपालिकेकरिता आवश्यक असलेली पदे वेळोवेळी निर्माण करण्यात आली आहेत. उपलब्ध कर्मचा-यांमार्फत नागरिकांना आवश्यक सेवा

पुरविण्याची कार्यवाही अहमदनगर महानगरपालिकेकडून करण्यात येते.
(३) व (४) अहमदनगर महानगरपालिकेने दि.१८.०४.२०११ च्या पत्राने सादर केलेल्या सेवा प्रवेश नियमांच्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करण्याकरिता तो महानगरपालिकेकडे परत पाठिवण्यात आला होता. आता महानगरपालिकेने सेवा प्रवेश नियमाबाबतचा सुधारीत प्रस्ताव सादर केला असून त्याची तपासणी करुन नियम अंतीम करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

आस्थापना खर्चाची विहित मर्यादा लक्षात घेवून मंजूर पदे भरण्याबाबतची कार्यवाही महानगरपलिकेकडून करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहर व पिंपरी - चिंचवड येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत**

**(४६) २५०७ (१५-०१-२०१५). श्री. संग्राम थोपटे (भोर), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर व पिंपरी - चिंचवड यथे ४४४ ठिकाणी १२८५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी मंजूर करण्यात आलेली योजना निधी अभावी सुरु करण्यात आली नसल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०१५) :**(१), (२) व (३) पुणे शहर व पिंपरी -चिंचवड येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**इंदापूर (ता.जि.पुणे) येथील रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(४७) २५३९ (२२-१२-२०१४). श्री. संग्राम थोपटे (भोर), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंदापूर (ता.जि.पुणे) येथील पश्चिम भागातील रस्ते अनेक वर्षापासून दुरुस्तीच्या प्रतिक्षेत असून या विभागातील सर्वच अंतर्गत रस्ते खराब झालेले असून अनेकदा या रस्त्यांची तातुरत्या स्वरुपात डागडुजी करण्यात येत असल्यामुळे सदरहू रस्त्याची दुरावस्था होत

असल्याने तेथील नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे तेथील नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०२-२०१५)** :(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्नाधीन भागातील राज्यमार्ग दर्जाची ९४.१० कि.मी. लांबी व प्र.जि.मा. दर्जाची १३२. २५ कि.मी. लांबी देखभाल दुरुस्तीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. मागील ३ वर्षात या लांबीपैकी १९.०० कि.मी. लांबीतील डांबरीकरणाची कामे विविध योजनेतंर्गत पूर्ण करण्यात आली आहेत व २३.०० कि.मी.लांबीतील डांबरीकरणाची कामे सद्य:स्थितीत प्रगतीत आहेत.

तसेच उर्वरित लांबीपैकी आवश्यक लांबीतील देखभाल व दुरुस्तीची कामे निधी निकष व प्राथम्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत संपुर्ण लांबीतील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

---

**राज्यातील नवीन टोलनाक्यावरील कंत्राटदाराने दररोज केलेली वसुली जाहीर करुन ते एकूण रक्कमेतून बजा करुन उर्वरित रक्कम टोलनाक्यावर इलेक्ट्रॉनिक डिसप्लेद्वारे दाखविण्याबाबत**

**(४८) २५४३ (२२-१२-२०१४). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नवीन टोलनाक्यावरील कंत्राटदाराने दररोज केलेली वसुली जाहिर करुन ते एकूण रक्कमेतून बजा करुन उर्वरित रक्कम टोलनाक्यावर इलेक्ट्रॉनिक डिसप्लेद्वारे दाखविण्याबाबत मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरू निर्णयाची कंत्राटदाराकडून अंमलबजावणी होत नसल्यास त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणती कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०३-२०१५)** :(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १२ जिल्ह्यामीधील सुमारे २ हजार गावे**
**भौगोलिकदृष्ट्या अतिसंवेदन घोषित करण्याबाबत**

**(४९) २५४९ (२२-१२-२०१४). श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२ जिल्ह्यामीधील सुमारे २ हजार गावे भौगोलिकदृष्ट्या अतिसंवेदन घोषित करण्यात आल्यामुळे या गांवाना मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावांना संरक्षण मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप. कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०३-२०१५) :**(१) हे खरे नाही.

डॉ. के कस्तुरीरंगन ह्यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय कार्यकारी गटमार्फत पश्चिम घाट परिसंवेदनशील क्षेत्राविषयीच्या (Eco Sensitive Area) तयार केलेल्या अहवालास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यातील ५६ तालुक्यातील २१५९ गावांच्या घाट परिसंवेदनशील क्षेत्रात समावेश करण्यात आला आहे. तथापि या गावांना मोठ्या प्रमाणात धोका असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील पैनगंगा नदीवरील ११ बॅरेजेस व लघु सिंचन प्रकल्पाचे कामास अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी व सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत**

**(५०) २५६७ (२३-१२-२०१४). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील पैनगंगा नदीवरील ११ बॅरेजेस व लघु सिंचन प्रकल्पावर अखर्चित निधी रु.२८२ कोटी असताना सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी कामे बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी खर्च करण्याची परवानगी व सुधारित प्रशासकीय मान्यता शासन केव्हापर्यंत देणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०३-२०१५) :**(१) नाही.
(२) सन २०१२-१३ मधील तरतूद १८ प्रकल्पांसाठी खर्च करण्यात शासन निर्णय दि. १८/०१/२०१४ अन्वये व सन २०१३-१४ मधील मंजुर अनुदान २१ प्रकल्पांसाठी खर्च करण्यास शासन शासन निर्णय दि. ०७/०८/२०१४ अन्वये परवानगी देण्यात आली आहे. तसेच २ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार कामे प्रगतीपथावर आहे.
(३) नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.